-२५-

आयुक्त कोकण विभाग
कोंकण भवन, नवी मुंबई
- 5 MAR 2006
आवक शाखा
DC (G)

श्रावणबाळ सेवा योजनेसाठी तसेच प्रशासकीय खर्चाच्या तरतूदीसाठी उप लेखाशिर्ष उघडण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :क्र.साअया-२००४/प्र.क्र.१९/विसयो
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक १ मार्च,२००४

वाचा :- १)शासन निर्णय सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. साअयो-२००४/प्र.क्र.१९/विसयो, दिनांक १४ जानेवारी,२००४

प्रस्तावना :- केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजने अंतर्गत ६५ वर्ष वयाच्या वरील निराधार स्त्री व पुरुष यांना केंद्र शासनातर्फे रु.७५/- प्रतिमहा निवृत्ती वेतन दिले जाते . याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या तरतूदीमधून रु.१७५/- प्रतिमहा एवढे पुरक अर्थसहाय्य संजय गांधी निराधार/ आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना व इंदिरा गांधी निराधार शेतमजूर महिला अनुदान योजनेच्या तरतूदीमधून दिले जाते. राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या हिश्याच्या रकमेच्या योजनांसाठी स्वतंत्र नाव देण्याचा व या योजनेसाठी स्वतंत्र उप लेखाशिर्ष उघडण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. त्याचबरोबर केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनामधील तरतूदीपैकी ५ टक्के तरतूद प्रशासकीय खर्चासाठी मंजूर करण्याचा प्रस्तावही विचाराधिन होता.

शासन निर्णय:- शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, रु.१७५/- प्रतिमहा अर्थसहाय्य दिल्या जाणाऱ्या योजनेचे नांव **श्रावणबाळ सेवा योजना** असे देण्यात यावे तसेच त्यासाठी स्वतंत्र उप लेखाशिर्ष उघडण्यासही मान्यता देण्यात यावी. सदरच्या नावाने ही योजना दिनांक १जानेवारी,२००४ पासून अंमलात आणण्यात येत आहे. त्यामुळे या पूर्वी संजय गांधी निराधार/ आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना व इंदिरा गांधी निराधार शेतमजूर महिला अनुदान योजने अंतर्गतच्या तरतूदीतून ६५ वर्ष वयाच्या वरील स्त्री व पुरुषांना वितरीत केली जाणारी रक्कम आता या योजनेच्या नांवे व या योजनेसाठी निर्धारीत केलेल्या उप लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात यावी व त्यासाठी स्वतंत्र अभिलेख ठेवण्यात यावा.

राज्य शासन पुरस्कृत संजय गांधी निराधार/ आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना,इंदिरा गांधी निराधार शेतमजूर महिला अनुदान व श्रावणबाळ सेवा योजने अंतर्गत मंजूर तरतूदींच्या ५ टक्के रक्कम प्रशासकीय खर्चासाठी मंजूर करुन, ती त्यासाठी उघडलेल्या उप लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यास मान्यता देण्यात येत आहे. श्रावणबाळ सेवा योजना व राज्य पुरस्कृत योजनेसाठी प्रशासकीय निधीसाठी आता खालीलप्रमाणे लेखाशिर्ष अस्तित्वात येईल. तरी या लेखाशिर्षांतर्गत आवश्यक त्या रकमेची देयके कोषागारास सादर करण्यात यावेत असे आदेश देण्यात येत आहेत.

२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,
०२-समाजकल्याण,
१०४-वृध्द विकलांग व निराश्रित व्यक्तींचे कल्याण,

(०८)(०७) श्रावणबाळ सेवा योजना (वृध्दापकाळ योजना)
(२२३५ २९१२)
(०१)(०१) भूमिहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य
(२२३५ ११२२) योजनेतर/दत्तमत, ५०-इतर खर्च.

(०८)(०८) निराधार वृध्द व्यक्तींना वार्धक्य वेतन, भूमिहीन वृध्द शेतमजुरांना अर्थसहाय्य व श्रावणबाळ सेवा योजना अंमलबजावणीसाठी प्रशासकीय खर्च (वृध्दापकाळ योजना)
(२२३५ ११२१) योजनेतर/दत्तमत, ५०-इतर खर्च.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.९८/ अर्थ-५, दिनांक २७.२.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(signature) 1.3.04
(डॉ. मुन्शीलाल गौतम)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग
प्रधान सचिव, वित्त विभाग
सर्व विभागीय आयुक्त, (B) BO/
सर्व जिल्हाधिकारी
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
सर्व कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१४/कोषा-४)
निवड नस्ती/कार्यासन.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - SGY
आवक नं. - ९२८९७/०४
29 MAR 2004
विशेष नोंद वही नं. -
कार्यविवरण नं. -
प्र. लि. | नि.उ.जि. | जिल्हाधिकारी

क्र/सामा(का-१) २कावि/प्र-४ ९१०४
आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, पहिला मजला
नवी मुंबई ४०० ६१४
दि. २२/३/०४
24 MAR 2004

प्रति
जिल्हाधिकारी - रत्नागिरी यांचेकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
२. शासन निर्णयात नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(signature)
आयुक्त, कोकण विभाग करिता

-२८-

अ.शा.प.क्र: संगांयो २००४/प्र.क्र.४४/विसयो
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य,क्रीडा व
विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च,२००४

डॉ.मुन्शिलाल गौतम,
प्रधान सचिव

प्रिय श्री. संतोष कुमार

आपल्याला माहित आहे की, शासनाचे या विभागानी विशेष सहाय्य योजनेंतर्गत येणाऱ्या तीन योजना संजय गांधी निराधार आर्थिक अनुदान योजना, इंदिरा गांधी निराधार व भुमिहिन शेतमजूर महिला योजना, श्रावणबाळ सेवा योजना (राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना) या सर्व योजनांचा सर्वकष अभ्यास करुन हया योजनांचा खरोखरच गरजू व्यक्तींना फायदा मिळावा या हेतूने या सर्व योजनांचे संकलन करण्यात आले आणि संकलनानंतर राज्य मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन क्र.साअयो २००३/प्र.क्र.१५९/विसयो दिनांक १४-१-२००४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या विभागांतर्गत वेबसाईटवर टाकण्यात आला आहे. संजय गांधी निराधार योजनेंतर्गत वृध्द व्यक्ती, अपंग, अंध, शारिरीक व मानसिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती व अज्ञान मुलांच्या संगोपनाची जबाबदारी असणाऱ्या निराधार विधवांना अर्थसहाय्य देण्याच्या हेतूने ज्या पूर्वी जाचक अटी होत्या (१) ज्यांच्याकडे काही तुटपुंजी मालमत्ता असेल तर त्याची निराधारांमध्ये गणना करण्यात येऊ नये आणि (२) सज्ञान मुले असतील तर त्यांना या योजनेसाठी पात्र धरु नये. सध्याच्या शासनाच्या या दोन्ही अटींमुळे देय लाभार्थ्यांना होत असलेला त्रास दूर करण्यासाठी दोन्ही जाचक अटी काढण्यात आल्या आणि याच अटी इंदिरा गांधी निराधार व वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनांसाठी होत्या त्याही काढण्यात आल्या.

२. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि शासनाची या योजनेबाबत अशी अपेक्षा आहे की, जे लोक अंध, अपंग आणि मानसिक आजाराने रोगग्रस्त झालेले आहेत त्यांना या योजनेचा फायदा प्राधान्यक्रमाने मिळावा. या तीनही योजना अंमलात आणण्यासाठी व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली असावयास पाहिजे ही अट कायम आहे. या अटीला कायम राखून शासनाची अशी अपेक्षा आहे की, अंध आणि अपंग व्यक्तींना अंमलबजावणी यंत्रणानी प्रामुख्यानी व्यक्तीगत लक्ष घालावे. जेणेंकरुन हा सर्वात कमजोर असलेला निराधार वर्ग यांना वेळेवर जीवन जगण्यासाठी राज्याचे अर्थसहाय्य मिळेल.

३. मला माहिती आहे की, जिल्हयांमध्ये शासनाच्या विविध योजना आपल्या स्तरावर राबविली जाते. पण जो व्यक्ती समुह असहाय्य आहे त्यांना सहाय्य देण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे असे माझे मत आहे. म्हणून याकडे आपण लक्ष द्याल ही शासनाची अपेक्षा आहे.

आपला स्नेहांकित,

( डॉ. मुन्शिलाल गौतम ) १९/३

श्री. संतोष कुमार,
जिल्हाधिकारी, रत्नागिरी,

5 APR 2004